महाराष्ट्र शासन
कार्यालय, सहसंचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती.
व्ही.एम.व्ही. परीसर, अमरावती-४४४ ६०४
दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५३१२३५ फॅक्स क्रमांक ०७२१-२५३१८५७
Email-jdheamt@yahoo.com Web: www.jdheamravati.org.in

क्रमांक- ससं/उशि/अनि-१/अमती/२०२५/ E- 1214117 /1576 दिनांक 26/09/2025

प्रति,

प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानीत महाविद्यालये,
अमरावती विभाग, अमरावती.

विषय:- उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहाय्यक या पदाला मा. न्यायालयाच्या आदेशानुसार ५ व्या वेतन आयोगानुसार रु.४०००-१००-६००० ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबत.

संदर्भ:- शासन निर्णय दिनांक २२.९.२०२५

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने विभागातील अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहाय्यक हे प्रयोगशाळा सहाय्यक पदास रु.४०००-१००-६००० ही वेतनश्रेणी लागू करण्याकरीता मा. न्यायालयामध्ये याचिका दाखल केल्या होत्या, सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांच बाजुने निकाला दिला आहे. मा. उच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेली विशेष अनुमती याचिका दि.५.१२.२०२४ च्य आदेशान्वये मा. न्यायालयाने खारीज केली आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी दिलेल्या आदेशाची अमलबजावणी क्रमप्राप्त आहे.

त्याअनुषंगाने उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२५/ई-१०८२४४५/विशि-१ दिनांक २२ सप्टेंवर २०२५ अन्वये राज्यातील प्रयोगशाळा सहाय्यक यांना ५ व्या वेतन आयोगानुसार रु.४०००-१००-६००० ही वेतनश्रेणी लागू करण्याबावतचे आदेश निर्गमित केलेले आहे.

सदर शासन निर्णयामध्ये दिलेल्या निर्देशानुसार महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहाय्यकांच्या वेतनाची वेतन निश्चिती सुधारीत करुन मंजुरीकरीता प्रस्ताव या कार्यालयात सादर करण्यात यावेत. जेणेकरुन सदर शासन निर्णयानुसार संबंधित कर्मचाऱ्यांना लाभ मंजूर करण्याची कार्यवाही या कार्यालयाकडून करता येईल. सुलभ संदर्भाकरीता शासन निर्णयाची प्रत सोबत जोडली आहे.

Digitally signed by
ABHAY KAMLAKAR KHAMBORKAR
Date: 26-09-2025 16:14:31

(डॉ.अभय खांबोरकर)
सहसंचालक, उच्च शिक्षण,
अमरावती विभाग, अमरावती

प्रतिलिपी :- लेखाधिकारी, उच्च शिक्षण अनुदान, अमरावती विभाग, अमरावती.

उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या अखत्यारित येणाऱ्या राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयांतील प्रयोगशाळा सहायक या पदाला मा.न्यायालयाच्या आदेशांनुसार ५ व्या वेतन आयोगानुसार रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
**शासन निर्णय क्रमांक : संकिर्ण -२०२५/ ई- १०८२४४५ /विशि-१,**
मंत्रालय विस्तार भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:-२२ सप्टेंबर, २०२५

वाचा:-

वित्त विभाग, शासन निर्णय, क्रमांक वेपुर-१२०१/प्र.क्र.४/सेवा ९, दिनांक २७.०२.२००६.

**प्रस्तावना:-**

वेतन असमानता समितीने केलेल्या शिफारशीनुसार वित्त विभागाच्या दि.२७.०२.२००६ च्या शासन निर्णयान्वये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठातील प्रयोगशाळा सहायक या पदाची वेतनश्रेणीमध्ये सुधारणा करून ४०००-६००० करण्यात आली आहे.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या विद्यापीठातील प्रयोगशाळा सहायक या पदाची रु.४०००-६००० ही वेतनश्रेणी लागू करावी, ह्या प्रमुख मागणीसाठी मा.उच्च न्यायालयात विविध याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्यांच्या बाजूने निकाल दिला आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात मा.सर्वोच्च न्यायालयामध्ये दाखल करण्यात आलेली विशेष अनुमती याचिका दि.०५.१२.२०२४ च्या आदेशान्वये मा.न्यायालयाने खारीज केली आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाने सदर प्रकरणी दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी क्रमप्राप्त आहे.

मा. न्यायालयाने दिलेल्या आदेशाच्या अनुषंगाने राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहायक पदाच्या वेतनश्रेणीत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहायक पदाच्या वेतनश्रेणीत पाचव्या वेतन आयोगानुसार पुढीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहे.

| पदनाम | ५ व्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणी | ५ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतनश्रेणी |
|---|---|---|
| प्रयोगशाळा सहायक | ३२००-४९०० | ४०००-६००० |

०२. राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहायक पदधारकांचे वेतन दि.०१.०१.१९९६ रोजी सुधारित वेतनश्रेणीत काल्पनिकरित्या निश्चित करण्यात यावे आणि त्यानुसार दि. ३१.०३.२००६ पर्यंतच्या वार्षिक वेतनवाढी काल्पनिकरित्या विचारात घेऊन प्रत्यक्षात दि.०१.०४.२००६ पासून वेतनश्चितीचा लाभ संबंधितांना अनुज्ञेय करण्यात यावा.

०३. दि.०१.०१.१९९६ ते दि.३१.०३.२००६ या कालावधीत सेवानिवृत्त झालेल्या प्रयोगशाळा सहायक या संवर्गातील कर्मचाऱ्यांचे सेवानिवृत्तीवेतन निश्चित करताना दि.०१.०१.१९९६ रोजीचे वेतन सुधारित वेतनश्रेणीत काल्पनिकरित्या निश्चित करण्यात यावे आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यतच्या कालावधीतील अनुज्ञेय वार्षिक वेतनवाढी काल्पनिकरित्या विचारात घेऊन सुधारित सेवानिवृत्तीवेतनाचा प्रत्यक्ष लाभ दि.०१.०४.२००६ पासून देण्यात यावा.

०४. सदर शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे संबंधितांना योग्यरितीने लाभ देण्याची जबाबदारी संचालक, उच्च शिक्षण तसेच संबंधित विभागीय सहसंचालक,उच्च शिक्षण यांची राहील.

०५. राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अनुदानित महाविद्यालयातील प्रयोगशाळा सहायक यांचे वेतन ज्या लेखाशिर्षामधून करण्यात येते त्याच लेखाशिर्षामधून सदरचा खर्च भागविण्यात यावा.

०६. सदरचा शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

०७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२५०९२२१९०३३१३२०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(प्रताप पां. लुबाळ)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा. राज्यपाल तथा कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्री (वित्त) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
४. मा. उप मुख्यमंत्री (नगर विकास) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६. मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
७. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व सह सचिव / उप सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०.सर्व विभागीय सहसंचालक, उच्चशिक्षण,
११.सर्व कुलसचिव, सार्वजनिक विद्यापीठे. महाराष्ट्र राज्य.
१२.निवड नस्ती